MHKO100006502022

**<u>आदेश निशाणी क्र. ६१</u>**

प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज वादी यांचा "पुढील उलटतपास नाहीचा" आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादीतर्फे वादी यांचा पुढील उलट तपास दिनांक ०८/०४/२०२५ रोजी घेण्यास सुरूवात केली होती व वादी यांचा बराचसा उलट तपास पुर्ण केला असून काही महत्वाच्या मुद्दयांवर उलट तपास घेणे बाकी आहे. त्याचदिवशी दुपारचे सत्रात उलट तपास घेतल्यानंतर सायंकाळी ५.२० मिनिटांनी नियोजीत कामाकरीता तातडीने कोल्हापूर येथे जाण्याचे असल्याने मुदतीचा अर्ज दाखल केला असता त्यावर वादी यांचा पुढील तपास नाही असा आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादी तर्फे यांची मुलगी कु. साची ही पोटदुखीने त्रस्त असल्याने तिला धन्वंतरी हॉस्पीटल कोल्हापूर येथे वैदयकीय तपासणी करून औषधोपचार घेणे आवश्यक असल्याने त्यांना पुढील उलट तपास घेता आला नाही. वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यान असलेला वाद गुणदोषावर निर्णय होण्याकरीता वादी यांचा पुढील उलट तपास नाही चा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. वादी यांचा उलट तपास घेण्याची संधी प्रतिवादी यांना दिल्यास वादी यांचे काहीही नुकसान होणार नाही. सबब अर्ज मंजूर करण्यात यावा.

३. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी यांना उलट तपास घेण्यास मुदती देण्यात आल्या होत्या. कोर्ट वेळ असताना मुदतीचा अर्ज देवून उलट तपास घेण्यासाठी मुदत मागणी केली. मे. कोर्टांनी उलट तपास घ्यावा असे तोंडी आदेश देवूनही उलट तपास घेतला नाही. अर्जात नमूद वकिलांची मुलगी आजारी असल्याचे कारण खोटे आहे. दिनांक ०८/०४/२०२५ रोजी दिले अर्जात दवाखाण्याचे कारण नमूद नाही. मे. कोर्टाचे तोंडी आदेशाचे प्रतिवादी यांचे वकिलांनी पालन केले नाही. खोटे कारण नमूद करून अर्ज दाखल केला आहे. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा.

**४.** अभिलेखावरील सर्व कागदपत्राचे अवलोकन केले असता वादी यांनी सदरचा दावा ते दावा मिळकतीचे गैरहक्काने मालक झाले आहेत असे हक्कज्ञापन होवून मिळण्याकरीता दाखल केला आहे. दिनांक ०८/०४/२०२५ दुपारचे सत्रात उलट तपास घेतल्यानंतर सायंकाळी ५.२० मिनिटांनी नियोजीत कामाकरीता तातडीने कोल्हापूर येथे जाण्याचे असल्याने मुदतीचा अर्ज दाखल केला असता त्यावर वादी यांचा पुढील तपास नाही असा आदेश पारीत करण्यात आला. त्यानंतर प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी दाखल केलेला आहे. अर्जात नमूद केलेप्रमाणे प्रतिवादी तर्फे वकील यांची मुलगी आजारी असल्याचे दर्शविण्यासाठी निशाणी ६३ चे वर्णन यादीसोबत त्यांचे मुलीला औषधउपचार घेतल्याबाबतचे प्रिस्क्रीपशन दाखल केलेले आहे. त्यामुळे यांना पुरावा करण्याची संधी देणे नैसर्गिक न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. प्रतिवादी विरूध्द झालेला पुढील उलटतपास नाहीचा आदेश रद्द न केलेस त्यांना न्याय हक्कापासून वंचित राहावे लागणार आहे. प्रतिवादी यांच्या कथनावर अविश्वास ठेवण्यासारखी परिस्थिती अभिलेखावर आलेली नाही. सबब प्रतिवादी यांचे अर्जातील कथनांचा विचार करता त्यांचे विरूध्द झालेला "पुढील उलटतपास नाहीचा" आदेश त्यांचेवर खर्च बसवून रद्द करून वादी यांचा उलटतपास घेण्यास परवानगी देणे न्यायोचीत होणार आहे. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

**१)** अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२)** प्रतिवादी यांनी वादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये ३००/- (अक्षरी रूपये तीनशे मात्र) देण्याच्या अटीवर प्रतिवादी यांचेविरूध्द झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द करून प्रतिवादी यांना वादीचा उलटतपास घेण्यास परवानगी देण्यात येते.

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2025.04.15 17:38:22 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक १५/०४/२०२५

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज